**Indian Academy of Pediatrics (IAP)**

**महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)**

## पालकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे :

**प्रकरण १२ :**

# लसीकरणानंतरच्या प्रतिकुल परिणामांशी सामना

अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गंगोलिया
सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार
मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये
समन्वयक : डॉ. नरेंद्र नानीवडेकर
अनुवादक : डॉ. रेणू बोराळकर
पुनरावलोकन : डॉ. सुहास कुलकर्णी
डॉ. उज्ज्वल करमळकर

*Convener:* **Vipin M Vashishtha**
*Members:* **Atul Kumar Agarwal, Chetan G Trivedi, SG Kasi**



लसीकरण सर्वसाधारणपणे सुरक्षित असले तरी काही वेळा मुलाच्या प्रतिकार शक्तीचा आणि इतर अनेक घटकांच्यामुळे मुलाला त्रास होऊ शकतो. त्याच्यावर बारकाईने लक्ष ठेवून त्या त्या त्रासाची नोंद झाल्यास आणि त्यावर ते उपचार केल्यास मुलाचा त्रास कमी करता येऊ शकतो. त्याबाबत काय पावले उचलावी लागतात ह्याच्याबद्दल आज पाहू या.

## "लसीकरणानंतरच्या प्रतिकुल परिणामांशी सामना" या संबंधीचे १० प्रश्न

प्र.१ लसीकरण का अत्यावश्यक आहे? प्रत्येक पाल्याला लसीकरण गरजेचे आहे का? लस सुरक्षित असते का?

प्र.२ लसीकरणानंतर शरीरावर काही प्रतिकुल परिणाम होतात का? सर्वसामान्यपणे कोणते दुष्परिणाम दिसून येतात? सौम्य, गंभीर आणि अतीगंभीर लक्षणे कोणती?

प्र.३ लसीकरणानंतर होणारे दुष्परिणाम हे सौम्य नसून वैद्यकीय मदतीची गरज आहे हे मला कसे कळेल? लसीकरणानंतर अशी प्रतिकुल स्थिती निर्माण झाली तर काय होईल?

प्र.४ नैसर्गिक संसर्गाने प्रतिकार शक्ती दीर्घकाळ वाढते का? जर नैसर्गिक आजार दिर्घकालीन प्रतिकार शक्ती प्रदान करत असेल तर मग लस घेण्याची गरज काय?

प्र.५ काही दिवसांपासून माझ्या मुलाला/मुलीला थंडी वाजते, खोकला आणि तापही आहे. त्याचा डीटीपी पोलिओ डोस उद्याच आहे. मी तो पुढे ढकलावा का?

प्र.६ बीसीजी लस दिल्यानंतर पाल्याच्या काखेत गाठ येतेय. हे चिंताजनक आहे का?

प्र.७ मागील वेळी पाल्याला लस दिल्यानंतर त्याला खूप ताप आला आणि लस दिल्या जागेवर वेदना होता आहेत, त्याचा पुढील डोस दोन दिवसांनी आहे. पुन्हा लस दिल्याने ताप येऊ नये म्हणून त्याला रुग्णालयात नेण्यापूर्वी पॅरासिटेमॉल द्यावे का?

प्र.८ एमएमआर लसीकरणानंतर पाल्य स्वमग्न होण्याची भीती असते का? पोलिओ डोस दिल्यानंतर नपुंसकता येते का?

प्र.९ गोवर प्रतिबंधक लस दिल्याने पाच नवजात बालके दगावल्याचे मी टिव्हीवर पाहिले हे खरे असेल का? अशा घटना वारंवार का घडतात? हे रोखण्यासाठी शासनाची आरोग्य यंत्रणा काय करत आहे? अशा घटनांची सत्यता आणि कारणांचा शोध कसा घेताला जातो.

प्र.१० पेन्टाव्हॉलेंट लस दिल्यानंतर ३ आठवड्यानंतर ५ महिन्याच्या बालकाला न्युमोनिया झाला. हा लसीकरणानंतरचा दुष्परिणाम म्हणता येईल का?

**Under the Auspices of the IAP Action Plan 20202021**

**Piyush Gupta**
IAP President 2021

**Remesh Kumar R**
IAP President-Elect 2021

**Bakul Parekh**
IAP President 2020

**GV Basavaraja**
IAP HSG 20202021

**Deepak Ugra**
National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

**Core Group**

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaram***

# 12

# लसीकरणानंतरच्या प्रतिकुल परिणामांशी सामना




## प्र.१

**लसीकरण का अत्यावश्यक आहे? प्रत्येक पाल्याला लसीकरण गरजेचे आहे का? लस सुरक्षित असते का?**

**Herd Immunity**




लसीकरण गरजेचे आहे कारण यामुळे बालकाच्या शरीराची रोग प्रतिकार शक्ती वाढते. विविध रोगांवर प्रतिकार शक्ती वाढवणाऱ्या लस मात्रा या “रोग प्रतिबंधक लसी” असतात. खरं तर अशा लसी या वैद्यकशास्त्राने मानवाला दिलेली सर्वात मोठी भेट मानायला पाहिजे. यामुळे लसीकरण झालेल्या बालकाचे अनेक रोगांपासून संरक्षण होते आणि एकूणच समाजाची प्रतिकार शक्तीही वाढीस लागते. अगदी सगळ्या बालकांचे लसीकरण नाही झाले तरीही एका अर्थाने हर्ड इम्युनिटी म्हणजे समुह प्रतिकार शक्तीही वाढीस लागते.



Small pox (देवी) पोलिओ इत्यादी सारखे गंभीर रोग केवळ मोठ्या प्रमाणात लसीकरण झाल्यानेच समूळ नष्ट झाल्याचे लक्षात येईल.

सद्य परिस्थितीत जगभर असणारा कोरोना व्हायरस (कोविड १९) संसर्गाने पुन्हा एकदा लसीकरणाचे महत्व अधोरेखित केले आहे. यामुळे ही महामारी रोखण्यास मदत झाली आहे. केवळ संसर्गजन्य रोग नाही तर संसर्गजन्य नसणारे गर्भशयाचा कर्करोग किंवा यकृत कर्करोगही प्रतिकारशक्ती वाढत गेल्याने नियंत्रणात आले आहे.

जर लसीकरण थांबवले गेले तर समाजातून हद्दपार झालेले रोग पुन्हा डोके वर काढतील. लसीकरण थांबले तर घटसर्प, डांग्या खोकळा, पोलिओ आणि गोवर यासारखे रोग समाजात पुन्हा लगेच उद्भवू शकतात. प्रत्येक बालकाचे लसीकरण तसेच जेवढ्या मोठ्या प्रमाणात व्यक्तिगत लसीकरण होईल तितकी समाजाची-समुहाची प्रतिकारशक्ती वाढते आणि संसर्ग रोखला जातो, लस प्रतिबंधक रोगांवर नियंत्रण येते. यामुळेच समाजातील प्रत्येक बालकाचे लसीकरण होणे गरजेचे आहे.






**लसीकरण सुरक्षित असते** : लस तुमच्यापर्यंत येण्यापूर्वी अनेक चाचण्यातून जात असते. बहुस्तरीय चाचणीनंतर आणि तपासणीनंतरच लस प्रमाणित केली जाते. वापरासाठी प्रमाणात मिळते.

लसीची परिणामकारकता प्रत्येक टप्प्यावर जोखली जाते, लस सुरक्षित असल्याची खात्री केली जाते. कोणतीही लस मान्यता प्राप्त होण्यासाठी साधारणत: पाच ते दहा वर्ष संशोधन केले जाते. वेळोवेळी बदल केले जातात आणि सरते शेवटी प्रमाणित केले जाते. बाजारपेठेत सार्वजनिक वापराकरिता लस आणली जाते तेव्हा लसीच्या दुष्परिणामांवर बारीक लक्ष ठेवणे अनिवार्य असते. विविध सुत्रांच्या माध्यमातून सातत्याने निरिक्षण करुन लसीकरणानंतर दुष्परिणाम होतात अथवा नाही याची माहिती घेतली जाते.

पाल्याचे लसीकरण करण्यापूर्वी मी डॉक्टरांना काही सांगितले पाहीजे का ?

★ माझ्या पाल्याची तब्बेत ठीक नाही.

★ आधीच्या लसीकरणानंतर पाल्याला कोणता अपाय झाला होता का ? त्रास झाला का ?

★ पाल्याला कोणती ॲलर्जी आहे का ?

★ पाल्याला असे एखादे औषध दिले जात आहे का, ज्यामुळे त्याची प्रतिकारक्षमता कमी होते ?



## प्र.२

# लसीकरणानंतर शरीरावर काही प्रतिकुल परिणाम होतात का? सर्वसामान्यपणे कोणते दुष्परिणाम दिसून येतात? सौम्य, गंभीर आणि अतीगंभीर लक्षणे कोणती?

लसीकरणानंतरच्या दुष्परिणामामध्ये मुख्यत्वे आरोग्यावर एखादा प्रतिकुल अथवा अनपेक्षित होणारा परिणाम संभवतो. लस दिल्यानंतर हे परिणाम दिसतात. पण लसीकरणामुळेच हे झाले असेल असे नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

सद्यस्थितीत प्रमाणित लसी, ज्या नियमितपणे निरोगी नवजात शिशू किंवा मुलांना दिल्या जातात त्या साधारणत: सुरक्षित असतात आणि लसीकरणानंतर किरकोळ परिणाम होतो. सगळ्या लसी या सुरक्षित आणि परिणामकारक आहेत मात्र योग्य रितीने त्या दिल्या तरच. जोखिम मुक्त अशी कोणतीही लस नाही आणि लसीकरणानंतर ठराविक कालावधीत दुष्परिणाम होऊ शकतो.

| |
|---|
| लस उत्पादन निगडीत - संबंधित परिणाम / प्रतिक्रिया |
| निकृष्ट दर्जाची लस- संबंधित परिणाम / प्रतिक्रिया |
| लसीकरणाप्रसंगीची त्रुटी - संबंधित परिणाम /प्रतिक्रिया |
| लसीकरण चिंता - संबंधित परिणाम /प्रतिक्रिया |
| योगायोगने दिसणारे दुष्परिणाम |

★ लसीकरणानंतर दिसणारी सौम्य लक्षणे किंवा परिणाम हे सर्वसामान्य आहेत. सौम्य लक्षणे किंवा परिणाम हे साधारणत: लसीकरणानंतरच्या काही तासांतच दिसून येतात आणि यासाठी विशेष करण्याचे किंवा रुग्णालयात जाण्याची गरज पडत नाही. यामध्ये लस दिलेल्या जागी दुखणे, सूज येणे किंवा ती जागा लाल होणं अशी लक्षणे आढळतात. कधी संपूर्ण शरीराला जाणवणारी लक्षणेही असतात. उदा. ताप येणे, स्नायू दुखणे, डोकेदुखी किंवा भुक न लागणे यासारखी लक्षणे दिसू शकतात.

ही लक्षणे किंवा परिणाम हे लसीकरणानंतर शरीर कसा प्रतिसाद देते यावर अवलंबून आहे. ज्याला आपण रोगप्रतिकारक शक्ती म्हणू शकतो.



★ लसीकरणानंतरची गंभीर लक्षणे किंवा परिणाम म्हणजे सौम्य लक्षणांची प्रखरता किंवा सौम्य लक्षणांची तीव्रता हे साधारणत: शरीराच्या रोगप्रतिकार शक्तीवर अवलंबून असते. या लक्षणांमध्ये अती ज्वर किंवा तीव्र ताप येऊ शकतो. तसेच लसीकरणाच्या जागेवर लालसर डाग अथवा सूज दिसू शकते. मात्र यामुळे कायमस्वरुपी कोणतीही शारीरिक हानी होत नाही. कायमस्वरुपी अपाय संभवत नाही, क्वचितच वैद्यकीय उपचाराची गरज पडते.

★ अतीगंभीर लक्षणांमध्ये मात्र वैद्यकीय उपचार गरजेचे असतात आणि यामुळे शरीराला कायमस्वरुप अपाय संभवतो किंवा मृत्यूही ओढवू शकतो. यामध्ये अतीगंभीर ऍलर्जी सदृष प्रतिक्रिया उमटणे, प्रतिकुल परिणाम दिसणे संभवते. एकाच केंद्रात दोन किंवा जास्त केसेस दिसल्या तर ते लसीकरण पश्चात अतीगंभीर लक्षणात गृहीत धरले जाते.


★ बहुतांश लक्षणे ही सौम्य असतात आणि यामध्ये काहीकाळ दुखणे व सूज येणे तसेच किंचित ताप येण्यासारखी लक्षणे असतात.

★ क्वचितच लसीकरणानंतर वैद्यकीय उपचारांची गरज भासते किंवा शारिरीक अपाय वा मृत्यू होतो. हे प्रमाण खूपच कमी आहे. कधी कधी एकाच लसीकरण केंद्रावर अशा दोन किंवा त्यापेक्षा अधिक केसेस दिसल्या तर ते गंभीर मानले जाते.

★ लसीकरणानंतर दिसणारी प्रतिकुल लक्षणे जी सौम्य अथवा गंभीर नाहीत ती अतीगंभीर ठरतात. एखाद्या ॲलर्जीमुळे जीविताचा धोकाही निर्माण होतो. हे तात्काळ उपचारातूनच नियंत्रित करता येते.

## प्र.३

## लसीकरणानंतर होणारे दुष्परिणाम हे सौम्य नसून वैद्यकीय मदतीची गरज आहे हे मला कसे कळेल? लसीकरणानंतर अशी प्रतिकुल स्थिती निर्माण झाली तर काय होईल?




लसीकरणानंतर केंद्रावर किमान पुढील १५ मिनिटे थांबा.

जर नवजात शिशू/बाळाला:

★ १०४फें पेक्षा जास्त ताप आला तर

★ बाळ एका दिवसापेक्षा जास्त काळ रडत आहे किंवा मुसमुसतोय.

★ लस दिलेल्या जागी खूप सूज आली असेल.

★ ॲलर्जी झाली (उदा. चट्टे किंवा पुरळ आल्यास)

★ असामान्य झोप / अती निद्रा

★ अती उलट्या, डायरिया किंवा शौचावाटे रक्त

★ अन्य काही असामान्य किंवा अचानक उद्भवणारी लक्षणे दिसल्यास कृपया आपल्या डॉक्टरांशी संपर्क करा.

अतीगंभीर लक्षणे दिसल्यास डॉक्टरांशी संपर्क करा. ते एक अर्ज भरतील ज्याला केस रिपोर्टींग फॉर्म (सीआरएफ) म्हणतात. हा अर्ज संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याकडे दिला जाईल, जे लसीकरण मोहिमेचे अधिकारी आहेत. हे अधिकारी लसीकरण पश्चात दुष्परिणाम झाले का याची शहनिशा करतील. लसीकरण पश्चात दुष्परिणामांची खात्री पटवण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरील मानकं निश्चित आहेत. या संपूर्ण प्रक्रियेला साधारणत: १०० दिवस लागू शकतात.

## प्र.४

## नैसर्गिक संसर्गान प्रतिकार शक्ती दीर्घकाळ वाढते का? जर नैसर्गिक आजार दिर्घकालीन प्रतिकार शक्ती प्रदान करत असेल तर मग लस घेण्याची गरज काय?

जर नैसर्गिकरित्या संसर्ग आजीवन प्रतिकारशक्ती प्रदान करणार असेल तर लसीकरणाची गरज काय? बहुतांशी जंतूससंर्ग हे सामान्यपणे आजीवन प्रतिकारशक्ती देऊ शकत नाहीत. उदा. टायफाईड, डांग्या खोकळा आणि धनुर्वात. काही जीवाणू हे बहुसंख्य प्रकारात आहेत ज्याला सीरोटाईप्स म्हटले जाते, यामुळेच एक सीरोटाईप दुसऱ्या प्रकारच्या सीरोटाईप जीवाणूपासून संरक्षण करु शकत नाही. उदा. न्युमोनिया किंवा मेंदू संसर्ग घडवू शकतात.

पण त्याहीपेक्षा नैसर्गिक संसर्गाने प्रतिकारशक्ती वाढवणे हे कधीही धोकादायक आहे. नैसर्गिक संसर्ग शरीरात गुंतागुंत निर्माण करु शकतात आणि मृत्यूही संभवतो. गोवर किंवा जन्मजात रुबेला सिंड्रोम आणि हिपाटायटीस बी विषाणूमुळे उद्भवणारा यकृत कर्करोग या सगळ्यामुळे मृत्यू संभवतो हे आता सर्वज्ञात आहे.

दुसरीकडे लस ही प्रतिकार क्षमतेशी जुळवून घेत ही क्षमता वाढवते जशी ती नैसर्गिक संसर्गाने वाढीस लागते, पण यातून कोणताही अन्य आजार होत नाही अथवा रोगप्रतिकार शक्ती वाढलेल्या व्यक्तिला कोणताही धोका संभवत नाही. थोडक्यात नैसर्गिक संसर्गाने होऊ शकणाऱ्या शारिरीक गुंतागुंत अथवा दुष्परिणामांपेक्षा लस हे भक्कम सुरक्षा देणारे साधन आहे.

## प्र.५

### काही दिवसांपासून माझ्या मुलाला/मुलीला थंडा वाजते, खोकला आणि तापही आहे. त्याचा डीटीपी पोलिओ डोस उद्याच आहे. मी तो पुढे ढकलावा का?

अशा साध्या आजारात, म्हणजे किंचित ताप असेल, श्वसनक्रियेत हलका संसर्ग जाणवत असेल, सौम्य अतिसार असेल तर लसीकरणाचे वेळापत्रक टाळू नये. सौम्य तापात लसीकरण कोणताही हानी करत नाही. मुल आजारी नसेल तर अगदी अशावेळी लसीकरणापूर्वी ताप मोजण्याचीही गरज नाही. लसमात्रेचा निर्णय हा मुलाच्या अंगातील तापापेक्षा त्याच्या एकूण तपासणीनंतर घेतला पाहिजे. मात्र, मुलाला मध्यम किंवा अती ताप-आजारपण असल्यास सर्व प्रकारच्या लस रुग्ण पूर्ण बरा होईपर्यंत देऊ नये.

तीव्र आजारात लसीची परिणामकारकता किंवा लसीमुळे दुष्परिणाम होतात असा कोणताही पुरावा नाही. मात्र लसीकरणानंतर येणारा ताप आजारपणाच्या नियंत्रणात बाधा आणू शकतो हे लक्षात ठेवले पाहिजे.





## प्र.५

## बीसीजी लस दिल्यानंतर पाल्याच्या काखेत गाठ येतेय. हे हे चिंताजनक आहे का?

नाही, बीसीजीमुळे जर बगलेत सुजेचे लक्षण असेल तर चिंता करण्याची गरज नाही. काही आठवड्यातच कोणत्याही उपचाराविना ही सूज उतरते. पण जर मोठ्या प्रमाणात सूज असेल आणि लालसर डाग आणि सतत दुखत असेल तर यासाठी अतिशय छोटासा वैद्यकीय हस्तक्षेप अर्थात सुजेच्या जागी हळूवारपणे सुई टोचून तिथे जमा झालेला द्रवपदार्थ काढून टाकणे हा उपाय केला जातो.



## प्र.७

## मागील वेळी पाल्याला लस दिल्यानंतर त्याला खूप ताप आला आणि लस दिल्या जागेवर वेदना होता आहेत, त्याचा पुढील डोस दोन दिवसांनी आहे. पुन्हा लस दिल्याने ताप येऊ नये म्हणून त्याला रुग्णालयात नेण्यापूर्वी पॅरासिटेमॉल द्यावे का?



लसीकरणानंतर उद्भवणाऱ्या वेदना किंवा ताप रोखण्यासाठी आधीच औषधी दिली आणि म्हणून लसीकरणानंतर त्रास झाला नाही अशी कोणतीही प्रमाणित घटना अथवा संदर्भ नाही. औषधोपचाराने रोगप्रतिकारक प्रतिसाद कमी होऊ शकतो, दबू शकतो हे लक्षात घेणे आवश्यक आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर लस मात्रा देताना प्रतिसादासाठी अनुकुल स्थिती असणे गरजेचे आहे. लस दिल्यानंतर काही दुष्परिणाम किंवा परिणाम दिसतात का यासाठी थांबावे आणि त्यानंतरच ताप अथवा वेदना कमी करण्याची उपाय योजना करावी हे उत्तम.

**लसीकरणानंतर /मुळे जाणवणाऱ्या वेदना कशा कमी करता येतील ?**

★ **स्तनपान** : बाळ स्तनपानावर असेल तर आईने त्याला लसीकरणापूर्वी, दरम्यान आणि नंतरही स्तनपानाला प्रोत्साहित केले पाहीजे.


अशावेळी स्तनपान हे वेदना कमी करते, पालकाची जाणीव, शरीर स्पर्श, दूध पिण्याची क्रिया यामुळे बाळ इतरत्र व्यस्त होऊन वेदना विसरते.

★ लसीकरणप्रसंगी बाळाला कुशीत ठेवणे.

★ थोड्या मोठ्या मुलांना लसीकरणाप्रसंगी पुस्तके किंवा अन्य रंजक माध्यमांसाठी प्रोत्साहित करावे.

★ स्थानिक भुल देणाऱ्या उपाय योजना करता येतील. स्पे किंवा जेलद्वारे हे शक्य आहे. मात्र योग्य वैद्यकीय सल्ल्यानंतरच हे केले पाहिजे.

मी ऐकले आहे की, माझी एक नातेवाईक मुलगी गर्भाशयाचा कर्करोग प्रतिबंधात्मक लस घेतल्यावर बेशुद्ध पडली. हे लसीमुळे झाले असेल का ?



नाही, बेशुद्ध पडण्याचा व लसीकरणाशी काही संबंध नाही. हे लसीमुळे नाही तर कधी कधी इंजेक्शनमुळे संभवते. लसीकरणप्रसंगीच्या चिंतेने हे घडू शकते. साधारणत: ११ ते १८ दरम्यानच्या किशोरवयीन मुलींमध्ये असे प्रकार होतात. कारण त्यांना लसीकरणाचाच तणाव असू शकतो.

लसीकरणानंतर बेशुद्ध पडणे थांबवायचे असेल तर मुलांना आधी लसीबद्दल माहिती देऊन त्यांना संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितली पाहिजे. मुलाला बसण्याच्या मुद्रेत किंवा झोपण्याच्या अवस्थेत लस दिली पाहिजे. लसीकरणानंतर १५ मिनिटे मुलाला एकाच जागी थांबण्याचे सुचित करणे गरजेचे आहे.

प्र.८

## एमएमआर लसीकरणानंतर पाल्य स्वमग्न होण्याची भीती असते का? पोलिओ डोस दिल्यानंतर नपुंसकता येते का?

नाही! लस आणि स्वमग्नता याचा कोणताही संबंध नाही.

स्वमग्नता लहान किशोरवयीन मुलांमध्ये दिसणारी लक्षणे असून यामागे असलेले कारण अजूनही अज्ञात आहे. या रोगाने पिडीत मुलांना आपले संवाद, कौशल्य आणि जनसंपर्क ठेवणे अडचणीचे असते. स्वमग्नतेची व आत्मगनतेची कारणे अज्ञात आहेत, पण अनुवंशिकता, मेंदूची बदलती संरचना किंवा सभोवतालच्या पर्यावरणातील घातक-विषारी घटकांमुळे मुलांमध्ये स्वमग्नता वाढते.




लस (एमएमआर) आणि मुलाची स्वमग्नता यामध्ये एक दुवा आहे, याचा संबंध आहे अशी मांडणी १९९८ मध्ये झालेल्या अभ्यासातून मांडले गेले होते. नंतर या अभ्यासातील अनेक त्रुटी लक्षात आल्या आणि त्या अभ्यासकाचा दृष्टीकोन आणि अभ्यासाचे निष्कर्ष यामध्ये फेरफार आढळून आले.

ज्या नियाताकालीकानी हा निष्कर्ष प्रकाशित केला त्यांनी नंतर यातील त्रुटी आणि फेरबदल झाल्याचे मान्य करत हा संशोधन अहवाल मागे घेतला. अनेक नियोजनबद्ध आणि वैज्ञानिकदृष्ट्या परिपूर्ण अभ्यासातून हे समोर आले आहे की, लसीकरण आणि स्वमग्नता यांचा दुरान्वयेही संबंध नाही. पोलिओ लस आणि नपुंसकत्व यांचा कोणताही परस्पर संबंध नाही. असा कोणताही पुरावा वा दाखला नाही की, पोलिओ लस दिल्यानंतर कुणाला नपुंसकत्व आले आहे. या लसीमध्ये कोणतेही असे घटक नाही की जे नपुंसक करु शकतील. पोलिओ लसीने जगातील अनेक देशांमधून हा रोग पूर्णत: संपवण्यात मोठी भुमिका बजावली आहे.




## प्र.९

## गोवर प्रतिबंधक लस दिल्याने पाच नवजात बालके दगावल्याचे मी टिव्हीवर पाहिले हे खरे असेल का? अशा घटना वारंवार का घडतात? हे रोखण्यासाठी शासनाची आरोग्ययंत्रणा काय करत आहे? अशा घटनांची सत्यता आणि कारणांचा शोध कसा घेताला जातो.

गोवर प्रतिबंधक लसीकरण आणि बालकांचा मृत्यू यामध्ये कोणताही थेट संबंध नाही. अशा दुर्घटना लसीची अयोग्य साठवणूक आणि व्यवस्थापनातील निष्काळजीपणामुळे घडतात. अर्धवट वापरलेल्या लस मात्रा कुपी सच्छिद्र रबर आवरणात किंवा थंड पाण्यात ठेवल्या गेल्यास घातक रोगांचा प्रसार करणाऱ्या जंतूचा संपर्क आल्याने अशा घटना घडू शकतात.

अशा दुष्परिणामांना आपण लसीकरण प्रसंगीचे दोष अथवा त्रुटी म्हणू शकतो.



अशा घटनांमध्ये सक्षम स्थानिक आरोग्य यंत्रणा त्वरीत तपासणी करते. यासाठी वैद्यकीय चाचण्या आणि प्रणालीचा वापर केला जातो. विशेष समितीद्वारे राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर अशा घटनांचा काळजीपूर्वक अभ्यासही केला जातो. आणि जर यामध्ये वस्तुस्थिती आढळली तर तशी पुरक कृतीही केली जाते. कार्यवाही केली जाते.

## प्र.१०

### पेन्टाव्हॉलेंट लस दिल्यानंतर ३ आठवड्यानंतर ५ महिन्या-च्या बालकाला न्युमोनिया झाला. हा लसीकरणानंतरचा दुष्परिणाम म्हणता येईल का ?

पेंटाव्हॅलंट लसीचे नियोजन आणि आजार यांचा संबंध नाही. न्युमोनिया, जीवाणू अथवा विषाणू संसर्गानंतर झालेला असू शकतो. अशा घटना योगायोगाने घडतात. लसी व्यतिरिक्त कोणता तरी अन्य घटक याला जबाबदार आहे. लसीकणाप्रसंगीच्या त्रुटी किंवा लसीकरणाप्रसंगीची चिंता-तणाव संशोधन होत गेले आणि लक्षात आले की, न्युमोनिया आणि लसीकरण यांचा दुरान्वयेही संबंध नाही.



कारण लसीकरणाच्या काही कालावधीनंतर न्युमोनिया झाल्याचे आढळले तर याचे कारण लस असू शकत नाही.